भारत सरकार

**विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय**

# भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिनियम, १९८८

**(१९८८ चा अधिनियम क्रमांक ६८)**

[१ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान]

# The National Highways Authority of India Act, 1988

**(Act No. 68 of 1988)**

[*As in force on the 1st March 1998*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९९

**[ किंमत : ३ रुपये ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि नॅशनल हायवे ॲथॉरीटी ऑफ इंडीया ॲक्ट, १९८८ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९, अंक १, दिनांक ८ ऑक्टोबर १९९८ यात पृष्ठ १३ ते २० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रितीने प्रकाशित करण्यात अल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ८ ऑक्टोबर १९९८.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The National Highways Authority of India Act, 1988 as on the 1st March 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 9, dated 8th October 1998 on pages 13 to 20.

This authoritative Text was published under the authority of the President under Section 2 Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 8th October 1998.

Dr. RAGHBIR SINGH,
Secretary to the Government of India.

# भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिनियम, १९८८

कलमांचा क्रम

## प्रकरण एक

### प्रारंभिक


कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण

३. प्राधिकरणाची घडण.

४. सदस्यांचा पदावधी व सेवा शर्ती.

५. सदस्य म्हणून नियुक्त होण्यासाठी अनर्हता.

६. सदस्यांची पुर्नानियुक्तीसाठी पात्रता.

७. बैठकी.

८. प्राधिकरणातील रिक्त पदामुळे कार्यवाही विधिअग्राह्य ठरणार नाही.

९. प्राधिकरणाचे अधिकारी, समंत्रक व इतर कर्मचारी यांची नियुक्ती.

१०. प्राधिकरणाने धंद्याच्या तत्त्वानुसार काम करणे.

प्रकरण तीन

संपत्ती आणि संविदा

११. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे निहित करण्याची किंवा सोपविण्याची केंद्र शासनाची शक्ती.

१२. केंद्र शासनाच्या मत्ता व दायित्वे यांचे प्राधिकरणाकडे हस्तांतरण.

१३. प्राधिकरणाकरिता जमिनीचे सक्तीचे संपादन.

१४. प्राधिकरणाने संविदा करणे.

१५. प्राधिकरणाच्यावतीने करण्यात येणाऱ्या संविदेची पद्धत.

प्रकरण चार

प्राधिकरणाची कामे

१६. प्राधिकरणाची कामे.

प्रकरण पाच

वित्त, लेखा आणि लेखापरीक्षा

१७. केंद्र शासनाकडून अनुदाने आणि कर्जे.

१८. प्राधिकरणाचा निधी.

१९. अर्थसंकल्प.

२०. निधीची गुंतवणूक.

२१. प्राधिकरणाच्या रकमा उसनवारीने घेण्याची शक्ती.

२२. वार्षिक अहवाल.

२३. लेखा आणि लेखापरीक्षा.

२४. वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षकांचा अहवाल संसदेसमोर ठेवणे.

## प्रकरण सहा

### संकीर्ण

२५. शक्तीचे प्रत्यायोजन.

२६. प्राधिकारणाचे आदेश आणि इतर लेखा यांचे अधिप्रमाणन.

२७. प्राधिकरणाचे कर्मचारी लोकसेवक असतील.

२८. सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

२९. विवक्षित बांधकामे हाती घेण्याची प्राधिकरणाची शक्ती.

३०. प्रवेश करण्याची शक्ती.

३१. कोणत्याही राष्ट्रीय महामार्गाचे व्यवस्थापन प्राधिकारणाकडून तात्पुरते काढून घेण्याची केंद्र शासनाची शक्ती.

३२. प्राधिकरण निष्प्रभावित करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

३३. निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.

३४. नियम बनविण्याची केंद्र शासनाची शक्ती.

३५. विनियम करण्याची प्राधिकरणाची शक्ती.

३६. अडचणी दूर करण्याची शक्ती.

३७. संसदेसमोर सादर करावयाचे नियम व विनियम.

# भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिनियम, १९८८

(१९८८ चा अधिनियम क्रमांक ६८)

(१ मार्च, १९९८रोजी यथाविद्यमान)

[१६ डिसेंबर, १९८८]

राष्ट्रीय महामार्गांचा विकास, त्यांची परिरक्षा व त्यांचे व्यवस्थापन यासाठी प्राधिकरण घटित करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा त्याच्याशी आनुषंगिक बाबींकरिता उपबंध करण्यासाठी अधिनियम.

भारतीय गणराज्याच्या एकोणचाळीसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अधिनियम, १९८८ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा दिनांकास ** तो अंमलात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "प्राधिकरण" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित केलेले भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, असा आहे ;

(ख) "अध्यक्ष" याचा अर्थ, प्राधिकरणाचा अध्यक्ष, असा आहे;

(ग) "कर्मचारी" याचा अर्थ, प्राधिकरणाकडे पूर्ण वेळ सेवेत असलेली व्यक्ती, असा आहे;

(घ) "सदस्य" याचा अर्थ, कलम ३ अन्वये नियुक्ती केलेला प्राधिकरणाचा सदस्य, असा आहे व यात अध्यक्षाचाही समावेश होतो;

(ङ) "राष्ट्रीय महामार्ग" याचा अर्थ, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ (१९५६ चा ४८) याच्या कलम २ अन्वये त्यावेळी राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केलेला कोणताही महामार्ग, असा आहे;

(च) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित, असा आहे;

(छ) "विनियम" याचा अर्थ, या अधिनियमान्वये प्राधिकरणाद्वारे केलेले विनियम, असा आहे;

(ज) यात वापरलेले व व्याख्या न केलेले परंतु राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ (१९५६ चा ४८) यामध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमात नेमून दिलेलेच अर्थ असतील.

## प्रकरण दोन

### भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण

३. (१) केंद्र शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे याबाबतीत नियुक्त करील अशा दिनांकापासून या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, भारताचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण या नावाने संबोधण्यात येणारे एक प्राधिकरण घटित करण्यात येईल. प्राधिकरणाची घडण.

(२) प्राधिकरण हे उपरोक्त नावाचे अखंड परंपरा असलेले आणि सामाईक मुद्रा असलेले, या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने स्थावर व जंगम या दोन्ही संपत्ती संपादन करण्याची, धारण करण्याची व निकालात काढण्याची आणि करार करण्याची शक्ती असलेले एक निगम निकाय असेल व उक्त नावाने त्याच्या विरुद्ध दावा दाखल करता येईल किंवा ते दावा दाखल करील.

(३) प्राधिकरणात केंद्र शासनाने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्ती करावयाचे,—

(एक) अध्यक्ष;

(दोन) पाचपेक्षा अधिक नाहीत इतके पूर्णकालिक सदस्य; आणि

(तीन) चारपेक्षा अधिक नाहीत इतके अंशकालिक सदस्य, यांचा समावेश असेल.

---

** १५ जून १९८९.

एच ४३५८—२ (१०४०—४-९९)

सदस्यांचा पदावधी व सेवा शर्ती.

४. सदस्यांचा पदावधी व अन्य सेवा शर्ती ह्या विहित केल्याप्रमाणे असतील.

सदस्य म्हणून नियुक्त होण्यासाठी अनर्हता.

५. जर एखादी व्यक्ती,—

(क) केंद्र शासनाच्या मते, नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असेल अशा अपराधाबद्दल सिद्धदोष ठरविण्यात आली असून तिला कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे; किंवा

(ख) ती अविमुक्त नादार आहे; किंवा

(ग) ती विकल मनाची आहे व सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केले आहे; किंवा

(घ) तिला शासनाच्या मालकीच्या किंवा शासनाचे नियंत्रण असलेल्या निगमाच्या सेवेतून काढून टाकले आहे किंवा बडतर्फ केलेले आहे; किंवा

(ङ.) तिचे प्राधिकरणात असे वित्तीय किंवा अन्य हितसंबंध असतील की, ज्यामुळे सदस्य म्हणून तिला तिची कार्ये पार पाडण्यात बाधक रीतीने अडथळा येण्याची शक्यता आहे असे केंद्र शासनाचे मत झाले असेल तर, ती व्यक्ती सदस्य म्हणून नियुक्त होण्यास अनर्ह ठरेल.

सदस्याची पुनर्नियुक्तीसाठी पात्रता.

६. विहित करण्यात येतील अशा सेवेच्या इतर अटी व शर्ती यांच्या अधीनतेने जिचे सदस्यत्व संपुष्टात आले आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा सदस्य म्हणून पुनर्नियुक्त होण्यास पात्र असेल.

बैठकी.

७. (१) प्राधिकरणाची सभा विनियमाद्वारे तरतूद करण्यात येईल अशा वेळी व ठिकाणी होईल आणि त्या सभेमध्ये गणपूर्तीसह सभेचे कामकाज चालवण्याबाबतच्या कार्यपद्धतीसंबंधीच्या नियमांचे अनुपालन करण्यात येईल.

(२) जर सभापती कोणत्याही कारणामुळे प्राधिकरणाच्या कोणत्याही सभेला उपस्थित राहण्यास असमर्थ असेल तर सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांनी निवडलेला कोणताही सदस्य सभेचे अध्यक्षपद स्वीकारील.

(३) प्राधिकरणाच्या सभेसमोर येणाऱ्या सर्व प्रश्नांवर उपस्थित सदस्यांच्या बहुमताने आणि मतदानाने निर्णय घेण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास सभापतीला किंवा त्याच्या अनुपस्थितीत अध्यक्षपदावरील व्यक्तीला दुसरे किंवा निर्णायक मत असेल व ती त्याचा वापर करील.

प्राधिकरणातील रिक्त पदामुळे कार्यवाही विधिअग्राह्य ठरणार नाही.

८. प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही केवळ पुढील कारणासाठी विधिअग्राह्य ठरणार नाही :—

(क) प्राधिकरणातील कोणतेही रिक्त पद किंवा प्राधिकरणाच्या घडणीतील कोणताही दोष; किंवा

(ख) प्राधिकरणाचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीतील कोणताही दोष ; किंवा

(ग) प्राधिकरणाने अंगीकारलेल्या कार्यवाहीतील, प्रकरणाच्या गुणवत्तेवर परिणाम न करणारी कोणतीही अनियमितता.

प्राधिकरणाचे अधिकारी, समंत्रक व इतर कर्मचारी यांची नियुक्ती.

९. (१) प्राधिकरण त्याची कामे पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी, विनियमाद्वारे ठरवून देण्यात येतील अशा अटींवर आणि शर्तींवर त्यास आवश्यक वाटतील इतके अधिकारी आणि इतर कर्मचारी यांची नियुक्ती करील.

(२) प्राधिकरण वेळोवेळी, त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, विनियमाद्वारे निर्धारित करण्यात येतील अशा अटींवर आणि शर्तींवर सल्लागार किंवा समंत्रक म्हणून कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करील.

प्राधिकरणाने धंद्याच्या तत्त्वांनुसार काम करणे.

१०. प्राधिकरण या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडताना, शक्य होईल तितपत धंद्याच्या तत्त्वांनुसार ती करील.

## प्रकरण तीन

### संपत्ती आणि संविदा

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे निहित करण्याची किंवा सोपवण्याची केंद्र शासनाची शक्ती.

११. केंद्र शासन वेळोवेळी, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल असा राष्ट्रीय महामार्ग किंवा त्याचा कोणताही पट्टा प्राधिकरणाकडे निहित करु किंवा सोपवू शकेल.

१२. (१) कलम ११ खालील अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेस किंवा त्या तारखेपासून,— केंद्र शासनाच्या मत्ता व दायित्वे यांचे प्राधिकरणाकडे हस्तांतरण.

(क) प्राधिकरणाकडे त्या कलमाअन्वये निहित केलेल्या किंवा सोपविलेल्या कोणत्याही राष्ट्रीय महामार्गाच्या किंवा त्याच्या कोणत्याही पट्ट्याच्या प्रयोजनार्थ किंवा, त्याच्या संबंधात अशा तारखेच्या लगतपूर्वी केंद्र शासनाने किंवा केंद्र शासनाबरोबर, किंवा केंद्र शासनासाठी घेतलेले सर्व ऋणे, आबंधने व दायित्वे, करण्यात आलेल्या सर्व संविदा आणि करावयाच्या ठरवलेल्या सर्व बाबी व गोष्टी ह्या, प्राधिकरणाने, प्राधिकरणाबरोबर किंवा प्राधिकरणासाठी केल्याचे, करण्यात आल्याचे आणि ठरवण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(ख) केंद्र शासनाने प्राधिकरणाकडे निहित केलेल्या किंवा सोपवलेल्या कोणत्याही राष्ट्रीय महामार्गाच्या किंवा त्याच्या कोणत्याही पट्टयाच्या प्रयोजनार्थ, किंवा त्यांच्या संबंधात अशा तारखेपर्यंत केलेला आणि केंद्र शासनाने भांडवल म्हणून घोषित केलेला सर्व अनावर्ती खर्च, विहित करण्यात येतील अशा अटी आणि शर्तींच्या अधीनतेने केंद्र शासनाने प्राधिकरणाला पुरवलेले भांडवल असल्याचे समजण्यात येईल;

(ग) अशा तारखेच्या लगतपूर्वी प्राधिकरणाकडे निहित केलेल्या किंवा सोपविलेल्या कोणत्याही राष्ट्रीय महामार्गाच्या किंवा त्याच्या कोणत्याही पट्टयाच्या संबंधात केंद्र शासनाला देय असलेली सर्व रक्कम प्राधिकरणाला देय असल्याचे मानण्यात येईल;

(घ) असा राष्ट्रीय महामार्ग किंवा त्याचा कोणताही पट्टा यांच्या संबंधात कोणत्याही बाबीसाठी अशा तारखेच्या लगतपूर्वी केंद्र शासनाकडून किंवा केंद्र शासनाविरुद्ध दाखल करण्यात आलेले किंवा जे दाखल करण्यात येणार असतील असे सर्व वाद आणि इतर वैध कार्यवाही प्राधिकरणाकडून किंवा प्राधिकरणाविरुद्ध पुढे चालू ठेवण्यात येईल किंवा दाखल करण्यात येईल.

(२) केंद्र शासनाची मत्ता, अधिकार किंवा दायित्वे यापैकी कोणती मत्ता, अधिकार किंवा दायित्वे प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहेत याविषयी कोणताही विवाद उद्भवल्यास अशा विवादाचा निर्णय केंद्र शासनाकडून देण्यात येईल.

१३. या अधिनियमाखालील कामे पार पाडण्याकरिता प्राधिकरणाला आवश्यक असलेली कोणतीही जमीन ही, सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याचे मानण्यात येईल अशी जमीन ही, भूमी संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) याच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर तत्सम कायद्याच्या उपबंधाअन्वये प्राधिकरणासाठी संपादन करण्यात येईल. प्राधिकरणाकरिता जमिनीचे सक्तीचे संपादन.

१४. कलम १५ च्या उपबंधाच्या अधीनतेने प्राधिकरण या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही संविदा करण्यास आणि तिचे पालन करण्यास सक्षम असेल. प्राधिकरणाने संविदा करणे.

१५. (१) प्राधिकरणाच्या वतीने करावयाची प्रत्येक संविदा, सर्वसाधारणत: किंवा विशेषकरून प्राधिकरणाकडून याबाबतीत शक्ती प्रदान करण्यात आलेला सभापती किंवा असा अन्य सदस्य किंवा प्राधिकरणाचा असा अधिकारी यांच्याकडून केली जाईल आणि विनियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा संविदा किंवा संविदांचे वर्ग यावर प्राधिकरणाची सामाईक मुद्रा लावण्यात येईल : प्राधिकरणाच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेची पद्धत.

परंतु, केंद्र शासन याबाबतीत विहित करील अशा मूल्याहून किंवा रकमेहून अधिक मूल्याची किंवा रकमेची संविदा, त्या शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय, करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, केंद्र शासनाच्या पूर्वमान्यतेशिवाय स्थावर संपत्तीचे संपादन किंवा विक्री यासाठीची किंवा अशा कोणत्याही संपत्तीच्या तीस वर्षांहून अधिक मुदतीच्या भाडे पट्टयासाठीची कोणतीही संविदा आणि ते शासन याबाबतीत विहित करील त्याहून अधिक मूल्याची किंवा रकमेची अन्य कोणतीही संविदा करण्यात येणार नाही.

(२) पोटकलम (१) च्या उपबंधाच्या अधीनतेने, या अधिनियमान्वये ज्या स्वरूपात व ज्या रीतीने कोणतीही संविदा करण्यात येईल ते स्वरूप व ती रीत ही, विनियमाद्वारे विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(३) या अधिनियमाच्या उपबंधानुसार नसलेली कोणतीही संविदा आणि विनियम हे प्राधिकरणावर बंधनकारक असणार नाहीत.

## प्रकरण चार

### प्राधिकरणाची कामे

१६. (१) केंद्र शासनाकडून याबाबतीत करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने शासनाने प्राधिकरणाकडे निहित केलेले किंवा सोपविलेले राष्ट्रीय महामार्ग किंवा इतर कोणताही महामार्ग यांचा विकास करणे, ते सुस्थितीत ठेवणे आणि त्यांची व्यवस्था ठेवणे हे प्राधिकरणाचे काम असेल. प्राधिकरणाची कामे

(२) पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या उपबंधांच्या सर्वसाधारणतेला बाधा न येता, प्राधिकरणाला त्याची कामे पार पाडण्याकरिता,—

(क) त्याच्याकडे निहित केलेल्या किंवा सोपविलेल्या महामार्गाचे सर्वेक्षण करणे, त्यांचा विकास करणे, ते सुस्थितीत ठेवणे आणि त्यांची व्यवस्था पाहणे;

(ख) त्याच्याकडे निहित केलेल्या किंवा सोपविलेल्या महामार्गालगत किंवा महामार्गाजवळ कार्यालय किंवा कर्मशाळा बांधणे आणि हॉटेलस्, मोटेलस्, उपाहारगृह आणि विश्रांतीकक्ष स्थापन करणे आणि सुस्थितीत ठेवणे;

(ग) आपल्या कर्मचाऱ्यांसाठी निवासी इमारती बांधणे आणि नगरी वसवणे;

(घ) महामार्गाच्या उचित व्यवस्थापनासाठी त्याच्याकडे निहित केलेल्या किंवा सोपविलेल्या महामार्गावर, वाहने चालवण्याबाबत विनियमन करणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे;

(ङ) भारतात किंवा परदेशात समंत्रक आणि संरचनात्मक सेवेचा विकास आणि त्याची तरतूद करणे आणि महामार्गाचा विकास, त्याची सुस्थिती व व्यवस्था यांच्या संबंधात किंवा तेथील कोणत्याही सुविधेच्या संबंधात संशोधन कार्य करणे;

(च) प्राधिकरणाकडे निहित केलेल्या किंवा सोपविलेल्या महामार्गाच्या उपयोग कर्त्यांसाठी अशा महामार्गावरील वाहतूक सुरळीतपणे चालावी म्हणून, त्याच्या मते आवश्यक असतील अशा सोयींची आणि सुखसोयींची तरतूद करणे;

(छ) या अधिनियमाद्वारे प्राधिकरणाकडे सोपविलेली कामे कार्यक्षमतेने पार पाडण्यास चालना देण्यासाठी कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) अन्वये एक किंवा अधिक कंपन्या निर्माण करणे;

(ज) शासनाच्या मालकीचे किंवा शासनाचे नियंत्रण असलेली कोणतेही निगम किंवा निगम निकाय याला प्राधिकरणाच्या कोणत्याही कामात गुंतवणे किंवा कामे त्याच्याकडे सोपविणे;

(झ) महामार्गाशी संबंधित बाबींवर केंद्र शासनास सल्ला देणे;

(ञ) परस्परात संमत असतील अशा अटींवर व शर्तीवर महामार्गाच्या विकासाच्या कोणत्याही योजना तयार करण्यात आणि त्या राबविण्यात राज्य शासनाला सहाय्य देणे;

(ट) वेळोवेळी विशोधित करण्यात आलेला राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ (१९५६ चा ४८) याच्या कलम ७ अन्वये देण्यात आलेल्या सेवेकरिता किंवा लाभाकरिता केंद्र शासनाच्या वतीने फी वसूल करणे आणि राज्य शासन विनिर्दिष्ट करतील अशा अटींवर व शर्तीवर राज्य शासनाच्या वतीने इतर फी वसूल करणे; आणि

(ठ) या अधिनियमाद्वारे त्याला प्रदान केलेल्या किंवा त्याच्याकडे सोपविण्यात आलेल्या कोणत्याही शक्तीचा वापर करण्यासाठी किंवा लादलेली कोणतीही कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असतील किंवा सोईस्कर असतील किंवा आनुषंगिक असतील अशा सर्व उपाययोजना करणे;

—या गोष्टी करता येतील.

(३) या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टींचा—

(क) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचा प्राधिकरणाकडून अनादर केला जाण्यास त्यास प्राधिकृत करणे; किंवा

(ख) प्राधिकरण किंवा त्याचे अधिकारी किंवा इतर कर्मचारी, हे या अधिनियमान्वये अन्यथा अधीन झाले नसते अशा कामाच्या किंवा दायित्वाच्या संबंधात कोणतीही कार्यवाही सुरू करण्यास कोणत्याही व्यक्तीस प्राधिकृत करणे,

—असा अन्वयार्थ लावला जाणार नाही.

## प्रकरण पाच

### वित्त, लेखा आणि लेखापरीक्षा

केंद्र शासनाकडून अनुदाने आणि कर्जे.

१७. केंद्र शासन, संसदेकडून याबाबत कायद्याद्वारे रीतसर विनियोजन केल्यानंतर, त्या शासनास आवश्यक वाटेल एवढ्या रकमेची अनुदाने व कर्जे यांची प्राधिकरणासाठी तरतूद करील.

प्राधिकरणाचा निधी.

१८. (१) "भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण निधी" या नावाचा एक निधी स्थापन करण्यात येईल आणि त्या निधीत—

(क) प्राधिकरणाला मिळालेले कोणतेही अनुदान किंवा सहाय्य;

(ख) प्राधिकरणाने घेतलेले कोणतेही कर्ज किंवा त्याने केलेली कोणतीही उधारी;

(ग) प्राधिकरणाला मिळालेली कोणतीही अन्य रक्कम.

(२) पुढील बाबींवरील खर्च भागवण्यासाठी निधीचे उपयोजन करण्यात येईल—

(क) अनुदाने, कर्जे किंवा केलेली कोणतीही उधारी ज्या प्रयोजनासाठी असतील ती प्रयोजने आणि त्याच्याशी संबंधीत किंवा तदानुषंगिक बाबी विचारात घेऊन प्राधिकरणाची कामे पार पाडण्यावर होणारा प्राधिकरणाचा खर्च;

(ख) प्राधिकरणाचे सदस्य, अधिकारी आणि अन्य कर्मचारी, यांच्यासाठी तरतूद केलेले वेतन, भत्ते, पारिश्रमिक आणि सुविधा;

(ग) या अधिनियमाद्वारे अधिकृत केलेल्या उद्दिष्टांवरील आणि प्रयोजनांवरील खर्च.

अर्थसंकल्प.

१९. प्राधिकरण, प्रत्येक वित्तीय वर्षी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशावेळी, प्राधिकरणाची अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा, पुढील वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प तयार करील आणि तो केंद्र शासनाकडे पाठवील.

निधीची गुंतवणूक.

२०. प्राधिकरण, केंद्र शासनाच्या कर्ज रोख्यांमध्ये किंवा विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने आपला निधी (कोणताही राखीव निधीसह) गुंतवू शकेल.

प्राधिकरणाच्या रकमा उसनवारीने घेण्याची शक्ती.

२१. (१) प्राधिकरण, केंद्र शासनाच्या संमतीने किंवा त्या शासनाने प्राधिकरणात दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष प्राधिकरणाच्या अटींस अनुसरून रोखे, ऋणपत्रे काढून किंवा या अधिनियमाखालील त्याची सर्व किंवा कोणतीही काम पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटतील असे इतर संलेख काढून कोणत्याही मार्गाने रकमा उसन्या घेऊ शकेल.

(२) केंद्र शासन, वेळोवेळी ठरवून देईल अशा मर्यादांच्या अधीनतेने प्राधिकरण, अधिकर्ष काढून किंवा अन्य प्रकारे त्याची या अधिनियमाखालील कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा रकमा तात्पुरत्या उसन्या घेऊ शकेल.

(३) केंद्र शासन, प्राधिकरणाने पोट कलम (१) खाली उसनवारीने घेतलेल्या रकमांच्या संबंधित, मुद्दलाची परतफेड करण्याची व त्यावरील व्याज देण्याची, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने हमी देऊ शकेल.

वार्षिक अहवाल.

२२. प्राधिकरण, प्रत्येक वित्तीय वर्षात विहित करण्यात येईल त्या स्वरूपात व त्यावेळी मागील वर्षातील त्याच्या कार्याचा संपूर्ण वृत्तांत देऊन एक वार्षिक अहवाल तयार करील व त्याची एक प्रत केंद्र शासनाकडे पाठवील.

लेखा आणि लेखापरीक्षा.

२३. प्राधिकरणाचा लेखा, भारताचे नियंत्रक व महालेखापाल यांच्याशी विचारविनिमय करून, विहित करण्यात येईल अशा रीतीने ठेवण्यात येईल आणि त्याची लेखापरीक्षा करण्यात येईल आणि प्राधिकरण, लेख्यांची लेखापरीक्षित प्रत आणि त्यावरील लेखापरीक्षकाचा अहवाल विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी, केंद्र शासनाकडे पाठवील.

वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षकांचा अहवाल संसदेसमोर ठेवणे.

२४. केंद्र शासन, वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षकांचा अहवाल तो प्राप्त झाल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण सहा

### संकीर्ण

शक्तीचे प्रत्यायोजन.

२५. प्राधिकरण, सर्वसाधारण किंवा विशेष लेखी आदेशाद्वारे त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा, कोणत्याही असल्यास, शर्तींच्या व मर्यादांच्या अधीनतेने, या अधिनियमाखालील त्याला योग्य वाटतील अशा (कलम ३५ खालील त्याच्या शक्ती वगळून) शक्तींचे व कामांचे प्रत्यायोजन सभापतीकडे किंवा इतर कोणत्याही सदस्यांकडे किंवा प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे करू शकेल.

प्राधिकरणाचे आदेश आणि इतर लेखा याचे अधिप्रमाणन.

२६. प्राधिकरणाचे सर्व आदेश, निर्णय आणि इतर लेखा हे, प्राधिकरणाचा सभापती किंवा कोणताही अन्य सदस्य किंवा प्राधिकरणाने याबाबतीत प्राधिकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी याच्या सहीने अधिप्रमाणित करण्यात येईल.

प्राधिकरणाचे कर्मचारी लोकसेवक असतील.

२७. प्राधिकरणाचे सर्व सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी हे, जेव्हा या अधिनियमाच्या उपबंधानुसार किंवा त्याखाली तयार केलेला कोणताही नियम किंवा विनियम याच्या उपबंधानुसार कृती करीत असतील किंवा त्यांनी कृती करणे अभिप्रेत असेल, तेव्हा ते भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम २१ च्या अर्थानुसार लोक सेवक असल्याचे मानण्यात येईल.

सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस वैध संरक्षण.

२८. (१) या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाखाली केलेल्या नियमान्वये किंवा विनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल प्राधिकरणाविरूद्ध किंवा प्राधिकरणाचा कोणताही सदस्य किंवा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध दावा, खटला किंवा कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

(२) या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाखाली केलेल्या नियमान्वये किंवा विनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही हानीबद्दल प्राधिकरणाविरुद्ध किंवा प्राधिकरणाचा कोणताही सदस्य किंवा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध दावा, खटला किंवा इतर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

विवक्षित बांधकामे हाती घेण्याची प्राधिकरणाची शक्ती.

२९. प्राधिकरण, शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या वतीने, ते प्राधिकरण आणि शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्यात संमत होतील अशा अटींवर व शर्तींवर कोणतेही बांधकाम किंवा सेवा किंवा बांधकामाचा किंवा सेवेचा कोणताही वर्ग, पार पाडण्यासाठी हाती घेऊ शकेल.

प्रवेश करण्याची शक्ती.

३०. याबाबतीत केलेल्या कोणत्याही विनियमांच्या अधीनतेने, प्राधिकरणाने याबाबतीत सर्वसाधारणतः किंवा विशेषतः प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनार्थ तसे करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही वेळी, कोणत्याही जमिनीवर किंवा आवारात प्रवेश करू शकेल, आणि—

(क) कोणतेही निरीक्षण, सर्वेक्षण, मोजणी, मूल्यांकन किंवा चौकशी करू शकेल;

(ख) पातळी घेऊ शकेल;

(ग) भुपृष्ठाखालील जमिनीत खणू शकेल किंवा विंधन काम करू शकेल;

(घ) बांधकामाच्या सीमा आणि उद्देशित मार्ग निश्चित करु शकेल;

(ङ) चिन्ह लावून आणि खड्डे खणून अशा पातळी, सीमा मार्ग यांच्या खुणा करू शकेल;

(च) विहित करण्यात येतील अशा इतर कृती किंवा गोष्टी करू शकेल :

परंतु, अशी कोणतीही व्यक्ती, अशा भोगवटादारास तसे करण्याचा त्याचा उद्देश असल्याबद्दलची किमान चोवीस तासांची लेखी पूर्व सूचना दिल्याशिवाय व राहत्या घराची कोणतीही सीमा किंवा त्याला जोडलेले कोणतेही आवार किंवा घराला संलग्न असलेले उद्यान यामध्ये (त्या घराच्या भोगवटादाराच्या संमतीशिवाय) प्रवेश करू शकणार नाही.

कोणत्याही राष्ट्रीय महामार्गाचे ते आदेशाद्वारे व्यवस्थापन आणि प्राधिकरणाकडून तात्पुरते काढून घेण्याची केंद्र शासनाची शक्ती.

३१. (१) कोणत्याही वेळी, केंद्र शासनाच्या मते तसे करणे आवश्यक किंवा इष्ट असेल, तर अशा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून आणि अशा कालावधीसाठी अशा व्यक्तीकडे कोणत्याही राष्ट्रीय महामार्गाचा किंवा त्याच्या एखाद्या भागाचा विकास, परिरक्षण किंवा व्यवस्थापन सोपवावे असा प्राधिकरणास निदेश देऊ शकेल आणि प्राधिकरण अशा निदेशाचे अनुपालन करण्यास बांधील राहील.

(२) कोणताही राष्ट्रीय महामार्ग किंवा त्याचा भाग याचा विकास, परिरक्षण किंवा व्यवस्थापन हे, पोटकलम (१), खाली विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे (यापुढे या कलमात प्राधिकृत व्यक्ती म्हणून निर्देशिलेली) सोपवलेले असेल त्या बाबतीत, प्राधिकरण असा राष्ट्रीय महामार्ग किंवा त्याचा भाग याच्याशी संबंधित या अधिनियमाखालील त्याच्या सर्व शक्तींचा वापर करण्याचे आणि कामे पार पाडण्याचे बंद करील आणि केंद्र शासन अशा व्यक्तीस वेळोवेळी देईल अशा, कोणतेही असल्यास अनुदेशांस अनुसरून प्राधिकृत व्यक्तीकडून अशा शक्तींचा वापर करण्यात येईल आणि कामे पार पाडण्यात येतील :

परंतु, केंद्र शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, केंद्र शासनाच्या पूर्व मंजुरीने असेल त्या व्यतिरिक्त, प्राधिकृत व्यक्तीकडून अशा कोणत्याही शक्तीचा वापर केला जाणार नाही किंवा कामे पार पाडली जाणार नाहीत.

(३) केंद्र शासन त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेला कालावधी कमी करू शकेल किंवा वाढवू शकेल.

(४) पोटकलम (१) अन्वये दिलेला आदेश प्रवर्तनामध्ये असेल त्या कालावधीत, ज्याचे किंवा त्याच्या भागाचे व्यवस्थापन प्राधिकृत व्यक्तीकडे सोपवले आहे, अशा महामार्गाचा किंवा त्याच्या भागाच्या संबंधातील प्राधिकरणाच्या या अधिनियमासंबंधातील शक्तींचा वापर करणे आणि कामे पार पाडणे त्या व्यक्तीला शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील असे निदेश वेळोवेळी प्राधिकरणास देण्यास आणि विशेषकरून महामार्गाच्या किंवा त्याच्या भागाच्या व्यवस्थापनासाठी प्राधिकरणाच्या निधीतून कोणतीही रक्कम अशा व्यक्तीकडे हस्तांतरित करण्यास केंद्र शासन सक्षम असेल आणि अशा प्रत्येक निदेशाचे अनुपालन प्राधिकरणाकडून केले जाईल.

(५) कोणताही राष्ट्रीय महामार्ग किंवा त्याचा भाग याच्या संबंधात पोटकलम (१) अन्वये दिलेला कोणताही आदेश, प्रवर्तनात असण्याचे बंद झाल्यावर , असा राष्ट्रीय महामार्ग किंवा त्याचा भाग याच्या संबंधातील या अधिनियमाखालील प्राधिकरणाच्या शक्तींचा वापर करण्याचे आणि कामे पार पाडण्याचे प्राधिकृत व्यक्तीकडून बंद केले जाईल आणि प्राधिकरण या अधिनियमाच्या उपबंधानुसार अशा शक्तींचा वापर करण्याचे आणि कामे पार पाडण्याचे चालू ठेवील.

(६) कोणताही राष्ट्रीय महामार्ग किंवा त्याचा भाग याच्या संबंधात पोटकलम (१) अन्वये दिलेला कोणताही आदेश, प्रवर्तनात असण्याचे बंद झाल्यावर, प्राधिकृत व्यक्ती, असा राष्ट्रीय महामार्ग किंवा त्याचा भाग व्यवस्थापनाच्या संबंधात तिच्याकडे राहिलेली कोणतीही संपत्ती (कोणतीही रक्कम किंवा इतर मत्ता धरुन) प्राधिकरणाच्या हवाली करील.

प्राधिकरण निष्प्रभावित करण्याची केंद्र शासनाची शक्ती.

३२. (१) जर कोणत्याही वेळी, केंद्र शासनाच्या मते,—

(क) ते प्राधिकरण गंभीर संकटामुळे या अधिनियमाच्या उपबंधान्वये त्याच्यावर लादलेली कामे व कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ असेल;

(ख) केंद्र शासनाने या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करण्यात किंवा या अधिनियमाच्या उपबंधान्वये त्याच्यावर लादलेली कामे व कर्तव्ये पार पाडण्यात प्राधिकरण नेटाने कसूर करत असेल; किंवा

(ग) लोकहितार्थ तसे करणे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असेल, तर केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या कालावधीसाठी प्राधिकरणास निष्प्रभावित करू शकेल :

परंतु, खंड (ख) मध्ये उल्लेखिलेल्या कारणांसाठी या पोटकलमान्वये अधिसूचना काढण्यापूर्वी केंद्र शासन, प्राधिकरणाला निष्प्रभावित का करण्यात येऊ नये, याचे कारण दाखविण्याची त्याला पुरेशी संधी देईल, आणि प्राधिकरणाचे जर काही स्पष्टीकरण आणि आक्षेप असतील, तर ते, विचारात घेईल.

(२) प्राधिकरणास निष्प्रभावित करणारी पोटकलम (१) खालील अधिसूचना प्रकाशित झाल्यावर,-

(क) सर्व सदस्य निष्प्रभावाच्या तारखेपासुन सदस्य म्हणून आपले पद रिकामे करतील,

(ख) प्राधिकरणाने किंवा त्याच्या वतीने, या अधिनियमाखालील ज्या शक्तींचा वापर करावयाचा व जी कामे व कर्तव्ये पार पाडावयाची, त्या सर्व शक्तींचा वापर, किंवा ती कामे व कर्तव्ये, पोटकलम (३) अन्वये अधिकरण पुनर्घटित होई तोपर्यंत, केंद्र शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून करण्यात येईल आणि पार पाडण्यात येईल.

(ग) प्राधिकरणाची, पोटकलम (३) खाली पुनर्रचना होईपर्यंत प्राधिकरणाच्या मालकीची किंवा प्राधिकरणाचे नियंत्रण असलेली संपत्ती, केंद्र शासनाकडे निहित होईल.

(३) पोटकलम (१) अन्वये काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावित करण्याचा कालावधी समाप्त झाल्यावर, केंद्र शासन,—

(क) त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, एक वर्षाहून अधिक नसेल अशा पुढील मुदतीकरिता निष्प्रभावित करण्याचा कालावधी वाढवू शकेल; किंवा

(ख) नवीन नियुक्तीद्वारे प्राधिकरणाची पुनर्घटना करू शकेल आणि अशा बाबतीत पोटकलम (२) च्या, (क) अनुसार जिने पद सोडले असेल अशी कोणतीही व्यक्ती नियुक्तीसाठी अनर्ह असल्याचे मानली जाणार नाही :

परंतु, केंद्र शासन पोटकलम (१) अन्वये मूलत: विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे जेव्हा निष्प्रभावित करण्याच्या कालावधीच्या किंवा या पोट कलमान्वये वाढवलेल्या कालावधीच्या समाप्तीपूर्वी कोणत्याही वेळी या पोटकलमाच्या खंड (ख) अन्वये कार्यवाही करू शकेल.

(४) केंद्र शासन, पोटकलम (२) किंवा पोट कलम (३) अन्वये काढलेली अधिसूचना आणि या कलमाखाली केलेल्या कोणत्याही कार्यवाहीचा पूर्ववृत्तांत आणि अशा कार्यवाहीस कारणीभूत ठरलेली परिस्थिती संसदेच्या दोन्ही सभागृहासमोर होईल तितक्या लवकर सादर करण्याची व्यवस्था करील.

निदेश देण्याची केंद्र शासनाची शक्ती.

३३. (१) या अधिनियमाच्या इतर उपबंधांना बाध न येता प्राधिकरण, या अधिनियमाखालील त्याची कामे आणि कर्तव्ये पार पाडताना, केंद्र शासन, धोरणविषयक प्रश्नांच्याबाबतीत वेळोवेळी लेखी देईल अशा निदेशांना बद्ध असेल.

(२) एखादा प्रश्न हा धोरणविषयक आहे किंवा कसे याबाबतचा केंद्र शासनाचा निर्णय अंतिम राहील.

नियम बनविण्याची केंद्र शासनाची शक्ती.

३४. (१) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उपबंध पार पाडण्यासाठी नियम करील.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या सर्वसाधारणतेला हानी न पोचवता अशा नियमात पुढील गोष्टींसाठी उपबंध करण्यात येतील—

(क) सदस्यांच्या पदावधी आणि इतर सेवाशर्ती;

(ख) सभापतीच्या आणि सदस्यांच्या शक्ती आणि कर्तव्ये;

(ग) कोणत्याही राष्ट्रीय महामार्गाच्या प्रयोजनासाठी किंवा त्या संबंधात केंद्र शासनाने किंवा केंद्र शासनासाठी करावयाचा अनावर्ती खर्च, ज्या अटींना व शर्तींना अधीन राहून, कलम १२ पोटकलम (१) खंड (ख) अन्वये प्राधिकरणास केंद्र शासनाने पुरविलेले भांडवल म्हणून समजावयाचा त्या अटी व शर्ती;

(घ) कलम १५ च्या पोटकलम (१) अन्वये विहित करणे आवश्यक असेल असे मूल्य किंवा रक्कम;

(ङ) प्राधिकरणाने कलम ११ खालील ज्या नमुन्यात आणि ज्या मुदतीत आपला अर्थसंकल्प आणि कलम २२ खालील आपला वार्षिक अहवाल तयार करावयाचा ती रीत;

(च) प्राधिकरण कलम २० खाली ज्या रीतीने निधी गुंतवू शकेल ती रीत;

(छ) प्राधिकरणाचे लेखे ज्या रीतीने ठेवण्यात येतील आणि त्यांची लेखापरीक्षा करण्यात येईल ती रीत आणि लेख्यांची लेखापरीक्षा केलेली प्रत व त्यावरील लेखापरीक्षकांचा अहवाल केंद्र शासनाला कलम २३ अन्वये ज्या तारखेपूर्वी पुरवावयाचा ती तारीख;

(ज) कलम ३० अन्वये प्रवेश करण्याच्या शक्तींचा वापर करण्यासंबंधीच्या शर्ती आणि निर्बंध आणि त्या कलमाच्या खंड (च) मध्ये निर्देशिलेल्या बाबी; आणि

(झ) विहित करणे आवश्यक असतील किंवा विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही बाबी.

**विनियम करण्याची प्राधिकरणाची शक्ती.**

३५. (१) प्राधिकरण, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यासाठी, या अधिनियमाची आणि त्याखाली केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करू शकेल.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या सर्वसाधारणतेला हानी न पोचवता, अशा विनियमात पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबीसाठी उपबंध करता येतील, त्या बाबी अशा,—

(क) प्राधिकरणाच्या बैठकीच्या वेळा आणि अशा बैठकीत कामकाज चालविण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती;

(ख) सेवेच्या अटी आणि शर्ती, सेवा प्रवेशाच्या पद्धती आणि प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचे आणि इतर कर्मचाऱ्यांच्या सेवाप्रवेशाची पद्धती व त्याचे पारिश्रमिक;

(ग) प्राधिकरणाकडून करण्यात येणारी संविदा किंवा संविदाचे वर्ग ज्या नमुन्यात व ज्या रीतीने करण्यात येतील तो नमुना आणि रीत आणि प्राधिकरणाच्या सामाईक मुद्रा ज्या संविदेवर किंवा संविदावर्गावर लावावयाच्या ती संविदा व संविदा वर्ग;

(घ) राष्ट्रीय महामार्गाच्या नेहमीच्या कामासाठी त्यावरील अडथळचास प्रतिबंध करण्याची रीत;

(ङ) प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या जागांव्यतिरिक्त राष्ट्रीय महामार्गावर कोणतेही वाहन उभे करून ठेवण्यास किंवा थांबवून ठेवण्यास प्रतिबंध करण्याची रीत;

(च) राष्ट्रीय महामार्गाच्या कोणत्याही भागावर प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्याची किंवा निर्बंध घालण्याची रीत;

(छ) राष्ट्रीय महामार्गावर किंवा राष्ट्रीय महामार्गासभोवती जाहिराती लावण्याचे नियम करण्याची किंवा त्यावर निर्बंध घालण्याची रीत; आणि

(ज) सर्वसाधारणपणे राष्ट्रीय महामार्गाचे कार्यक्रम योग्य परिरक्षण आणि व्यवस्थापनासाठी नियम.

**अडचणी दूर करण्याची शक्ती.**

३६. (१) या अधिनियमाचे उपबंध अंमलात आणण्यात कोणतीही अडचण उद्भवल्यास केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटेल त्याप्रमाणे या अधिनियमाच्या उपबंधाशी विसंगत असलेला आदेश काढू शकेल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षाच्या समाप्ती नंतर असा आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर सादर करण्यात येईल.

**संसदेसमोर सादर करावयाचे नियम व विनियम.**

३७. या कलमाखालील केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, त्या नियमात किंवा विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले अथवा तो नियम किंवा विनिमय करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा विनियम अशा आपरिवर्तित स्वरुपातच परिणामकारक होईल किंवा प्रकरणपरत्वे मुळीच परिणामकारक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा विनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.